# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

रौप्य महोत्सवी वर्ष
१९७९-२००४

४ था मजला, एक्सप्रस टावस, नरामन पाइंट, मुंबई-४०० ०२१
दूरध्वनी क्र. : २२०२६२४९, २२८३५२४७ फॅक्स : २२०२९१३४८
ई.मेल पत्ता: mstmjp@rediffmail.com
caomjp@rediffmail.com
वेब पत्ता : mahajeevan.com


जा.क्र.मजीप्रा/सस/तांशा-१/३५०/ 9334        दिनांक : ९.१२.२००५

## परिपत्रक क्र. १०८

विषय : **दिरंगाईने कामे करणा-या ठेकेदाराविरुध्द कारवाई करण्याबाबत..**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील कांही ठेकेदार पुरेसा निधी उपलब्ध असूनही मंदगतीने कामे करतात; व त्यामुळे प्राधिकरणास विविध अडचणींना सामोरे जावे लागते. एखादया योजनेवर पुरेसा निधी उपलब्ध असूनही ठेकेदार कामात दिरंगाई करीत असेल तर स्वीकृत निविदेच्या कलम २ नुसार ठेकेदारावर दंडात्मक कारवाई करता येते. तसेच कलम-३ नुसार अशा ठेकेदाराविरुध्द कारवाई करुन त्यांचे खर्चाने व जबाबदारीवर दुस-या ठेकेदाराकडून काम करुन घेता येते. परंतु स्वीकृत निविदेतील वरील कलमानुसार करावयाच्या कारवाईमध्ये खूप वेळ तर जातोच; शिवाय योजनांची कामे अजून रखडतात. त्यामुळे योजनांच्या कामावर ब-याच प्रमाणांत खर्च होऊन सुध्दा नागरिकांना पाणी पुरवठयाचा लाभ वेळेवर मिळत नाही. परिणामतः महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिका-यांना जनक्षोभास सामोरे जावे लागते. विविध बैठकांमध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कार्यपध्दतीवर टीका होऊन मानहानीचे प्रसंग येतात व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची प्रतिमा मलीन होते. या अनुषंगाने कामात कुचराई करणा-या अशा प्रवृत्तीच्या ठेकेदाराविरुध्द निश्चित व कमी वेळात परिणाम करणारी कारवाई करुन त्यांची नोंदणी निलंबित करण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दिनांक १९ ऑक्टोबर,२००५ रोजी झालेल्या १०१ व्या बैठकीत सादर करण्यांत आला होता. सदर प्रस्ताव मंजूर झाला असून या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार खालील प्रमाणे सूचना देण्यांत येत आहेत.

१. पुरेसा निधी उपलब्ध असूनही ठेकेदार कामात दिरंगाई करीत असेल तर प्रथम स्वीकृत निविदेतील कलम-२ नुसार ठेकेदारावर दंडात्मक कारवाई करावी. अशा प्रकारे दंडात्मक कारवाई करुनसुध्दा ठेकेदाराने कामाची समाधानकारक प्रगती न दाखविल्यास ठेकेदारास १५ दिवसांची लेखी नोटीस देऊन अशा ठेकेदाराची नोंदणी ३ वर्षासाठी निलंबित करावी.

२. वरील प्रमाणे ठेकेदाराची नोंदणी निलंबित करण्याचे अधिकार जे अधिकारी ज्या वर्गाच्या नोंदणीस सक्षम आहेत त्या अधिका-यांना देण्यांत येत आहेत.

३. या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या प्रचलित कंत्राटदार नोंदणी नियमावलीत योग्य ते बदल करण्यांसही संचालक मंडळाने मान्यता दिलेली असलेमुळे तसे बदल करणेत यावेत. यापुढील निविदांमध्ये अशा प्रकारचे कलम न चुकता अंतर्भूत करावे.

उपरोक्त सूचना सदर परिपत्रकाच्या दिनांकापासून अंमलात येतील. तसेच वरील सूचना आपल्या कार्यक्षेत्रांतील सर्व कंत्राटदारांच्या निदर्शनास आणून दयाव्यात.

(माधव दोमकोंडवार)
सदस्य सचिव

**प्रत :**

मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई यांच्या माहितीसाठी सादर.
मुख्य अभियंता, म.जी.प्रा, यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई यांना माहितीसाठी.
अधीक्षक अभियंता (मुख्यालय) म.जी.प्रा., नवी मुंबई यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा. मंडळ, यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
मुख्य प्रशासकीय अधिकारी, म.जी.प्रा. मुंबई-२१ यांना माहितीसाठी.
कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा. बांधकाम विभाग, यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.

mg..Ts.-i.Circular..

मजीप्रा
रवाना
26/12/05
मुंबई-२१